पुण्यनगरी पू. पान क्र. 1

# जमीन हडप प्रकरणी तिघांना अटक



। **मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या भाजपच्या माजी नगरसेवकाच्या भावाने डोंबिवली येथे राहणाऱ्या मृत व्यक्तीच्या नावावर असलेल्या जमिनीचे कागदपत्र बनवण्यासाठी स्टॅम्प पेपरवर खोट्या सह्या केल्या. तसेच ते कागदपत्र खरे असल्याचे भासवून कल्याण तहसील कार्यालयात जमा करून त्या जमिनीवरील सातबाऱ्यावर त्याचे नाव लावून घेतले. खोट्या सह्या करून जमीन हडप केल्याप्रकरणी कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मीरा रोड येथील भाजपच्या माजी नगरसेवकाच्या भावासह दोघांना अटक केली आहे.

मीरा रोड येथे राहणाऱ्या प्रमोद दुबे यांचे मीरा रोड येथे स्टॅम्प पेपर विक्रीचे दुकान आहे. डोंबिवली येथे राहणाऱ्या महिलेच्या सासऱ्याचे निधन झालेले होते. त्या महिलेने सासऱ्याच्या नावावर असलेली कल्याण येथील जमीन पतीच्या नावावर करण्यासाठी अर्ज केला. त्या वेळी त्या महिलेला ती जमीन दुसऱ्याच्या नावावर झाल्याची माहिती मिळाली. त्यांनी जमिनीचे कागदपत्रे काढली असता त्यांच्या मृत सासऱ्याच्या स्टॅम्प पेपरवर खोट्या सह्या केलेल्या आहेत. तसेच ते कागदपत्र खरे असल्याचे दाखवून कल्याण तहसील कार्यालयात जमा करून ती जमीन प्रमोद दुबे याच्या नावावर झाल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी त्या महिलेने कुटुंबातील दोन सदस्यांसह प्रमोद दुबेवर बनावट स्टॅम्प पेपर बनवून तहसीलदार कार्यालयात जमा करून जमीन नावावर करून घेतल्याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांनी पथकासह प्रमोद दुबे याला मीरा रोड येथून तसेच त्याच्या अन्य दोन साथीदारांना अटक केली.

# एकाच नंबर प्लेटच्या दोन रिक्षा



। **नालासोपारा :** नालासोपाऱ्यात बोगस रिक्षांचा सुळसुळाट झाला असून, वाहतूक पोलिसांच्या तपासणीत एकाच नंबर प्लेटच्या दोन रिक्षा आढळून आल्या. त्यापैकी एका बोगस रिक्षाचालकांवर आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कमलेशकुमार सुदामा साव असे गुन्हा दाखल झालेल्या बोगस रिक्षाचालकाचे नाव आहे. नालासोपारा पूर्व, अल्कापुरी कॅपिटल मॉलजवळ वाहतूक पोलीस राजू गायकवाड कर्तव्य बजावत असताना एकाच नंबरच्या दोन रिक्षा आढळून आल्या. या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यनगरी पू.पान क्र.4

# भाईंदर रेल्वे स्थानकात सरकते जिने व शौचालयाचे लोकार्पण

। **मीरा रोड :** भाईंदर रेल्वे स्थानकात बालाजी नगर परिसरातील प्रवाशांना होणाऱ्या त्रासामुळे सरकते जिने व शौचालय नागरिकांसाठी खुले करण्यात आले. भाईंदर रेल्वे स्थानकात नवीन पादचारी पूल उभारण्यात आला होता. परंतु त्याला जोडणाऱ्या सरकते जिन्याचे काम अपूर्ण होते.त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी हा पादचारी पूल सुरू करून घेतला. परंतु त्याला जोडणाऱ्या सरकत्या जिन्यांचे काम जलद गतीने करण्यासाठी पश्चिम रेल्वे महाव्यवस्थापक यांच्या दालनात झालेल्या बैठकीत वारंवार हा मुद्दा उपस्थित करून आता या सरकत्या जिन्याचे काम पूर्ण झाले आहे. खासदार राजन विचारे यांच्या पाठपुराव्याने भाईंदर रेल्वे स्थानकात ५ सरकते जिने सुरू झाले असून सहाव्या सरकत्या जिन्याचे लोकार्पण करण्यात आले आहे. याच पुलाला नवीन सरकते जिने व ३ लिफ्टमध्ये वाढ करण्यात येणार असून एमआरव्हीसीमार्फत बोरिवलीच्या धर्तीवर मीरा रोड व भाईंदर रेल्वे स्थानकाची डेक लेव्हलवर फलाटाची निर्मिती होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मीरा रोड रेल्वे स्थानकाचे काम सुरू झाले आहे, असे खासदार राजन विचारे यांनी सांगितले.

CamScanner

सकाळ पान क्र.5

# पोलिस निरीक्षकाला आरोपीकडून धक्काबुक्की

नालासोपारा, ता. २७ (बातमीदार) : चौकशीसाठी पोलिस ठाण्यात आणलेल्या एका व्यक्तीने चक्क पोलिस ठाण्यातच वरिष्ठ पोलिस निरीक्षकासह मध्यस्थी करणाऱ्या पोलिस अधिकारी, कर्मचारी यांना धक्काबुक्की केली. हा प्रकार गुरुवारी (ता. २५) तुळिंज पोलिस ठाण्यात घडल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी तुळिंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून संबंधिताला अटक करण्यात आली आहे.

नालासोपारा येथे राहणाऱ्या शशिकांत बालाजी गुजराती याला वॉरंट बजावण्यासाठी तुळिंज पोलिस त्याच्या घरी गेले होते. त्या वेळी त्याने सहायक पोलिस उपनिरीक्षकांना शिवीगाळ करून त्यांच्यासोबत उद्धट वर्तन केले. त्यामुळे पोलिसांनी त्याला तुळिंज पोलिस ठाण्यात चौकशीसाठी नेले आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्यासमोर उभे केले. त्या वेळी गुजराती याने सहायक पोलिस उपनिरीक्षक हिरालाल तडवी आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्याशी वाद घातला. आरोपीने पोलिसांच्या सरकारी गणवेशाच्या शर्टाची बटणे व खांद्यावरील ताऱ्यांची पट्टी तोडून त्याचे नुकसान केले असल्याचे समोर आले आहे.

नवरा-बायकोच्या वादातील खावटीचे समन्स बजावण्यासाठी आमचे पोलिस शशिकांत गुजराती या आरोपीकडे गेले होते. तो मनोरुग्ण आहे. गुरुवारी माझ्या केबिनमध्येही त्याने गोंधळ घातला. आम्ही त्याला तात्काळ ताब्यात घेऊन, त्याच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे.
- शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तुळिंज

# घरफोडी करणारा अटकेत

नालासोपारा, ता. २७ (बातमीदार) : रात्रीच्या वेळी घरफोडी करून फरारी होणाऱ्या सराईत चोरट्याला पेल्हारमध्ये अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. अटक आरोपीकडून ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अब्दुल रहेमान तहीर वडू असे अटक आरोपीचे नाव असून नालासोपारा पूर्व पेल्हार गावातील राहणारा आहे.

नालासोपारा पूर्व पेल्हार परिसरातील रिलायबल बिल्डिंगमध्ये २० मे च्या मध्यरात्री घरफोडी झाली होती. या घरफोडीचा पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. गुन्ह्याच्या अनुषंगाने पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे यांनी पथक तयार केले होते. गुन्हे प्रकटीकरणचे प्रभारी पोलिस निरीक्षक महेंद्र शेलार यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक सुनील पाटील, पोलिस हवालदार योगेश देशमुख, प्रताप पाचूनदे, पोलिस अंमलदार बालाजी गायकवाड, सचिन बळीद, संदीप शेळके, मोहसीन दिवाण, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांचे पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना केले होते. पथकाने पेल्हार विभागातूनच या आरोपीचा शोध घेऊन तपास केला असता त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

सकाळ पू.पान क्र.3

# वज्रेश्वरी देवस्थानकडील जमिनी पुन्हा शेतकऱ्यांच्या नावावर

## वसई तालुक्यातील शेतकऱ्यांना सात-बारा वाटप



विरार : आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याहस्ते वसई तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचे सात-बारा कागदपत्र वाटप करण्यात आले.

**विरार, ता. २७ (बातमीदार) : वसई तालुक्यातील मेढे, आंबोडे, भिनार, वडघर या गावांतील १२९ शेतकऱ्यांच्या जमिनीवर वज्रेश्वरी देवी देवस्थानचा शिक्का होता. आता या जमिनींचा तिढा सुटल्याने त्या शेतकऱ्यांच्या नावे झाल्या आहेत. त्यामुळे आता ते त्यांच्या कब्जे वहिवाटीच्या जमिनीचे मालक झाले आहेत. आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते शेतकऱ्यांना सात-बारा वाटप करण्यात आले. त्यामुळे या चार गावांत आता आनंदोत्सव सुरू आहे. शेतकऱ्यांच्या चार दशकांहून अधिक वर्षांच्या लढ्याला यश मिळाले आहे.**

तालुक्यातील मेढे, आंबोडे, भिनार, वडघर या गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनीवर १९७२ मध्ये वज्रेश्वरी देवी देवस्थानच्या नावाचा शिक्का लागला होता. याविरोधात येथील शेतकऱ्यांनी लढा सुरू केला होता. या लढ्यात बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून या लढ्यात सहभाग घेतला होता. भिनार गावातील कार्यक्रमात वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील, बोईसरचे आमदार राजेश पाटील, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष राजेंद्र पाटील, माजी खासदार बळिराम जाधव यांचा विशेष सन्मान गावकऱ्यांनी केला; तर पाहुण्यांच्या हस्ते मूळ मालक झाल्याचे सात-बारा शेतकऱ्यांना प्रदान करण्यात आले.

या लढ्यात सहभागी असणाऱ्या शेतकरी, आंदोलनकर्त्या महिलांचाही सन्मान करण्यात आला. या वेळी पंचायत समिती सभापती अशोक पाटील, पांडुरंग पाटील यांच्यासह मान्यवर आणि महिला वर्गासह शेतकरी उपस्थित होते.

CS CamScanner

सकाळ पान क्र.2

# दोन्ही पक्षांच्या घटना मागविणार

## आमदार अपात्रेबाबत विधानसभा अध्यक्षांची भूमिका

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. २७ : सत्तासंघर्षावरून १६ आमदारांच्या अपात्रेबाबतच्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे असून, त्याबाबतच्या कार्यवाहीसाठी शिवसेनेच्या ठाकरे आणि शिंदे गटांच्या पक्षीय घटनेची माहिती निवडणूक आयोगाकडून मागविण्याची भूमिका विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घेतली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत माहिती उपलब्ध झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशावर प्रक्रिया होऊ शकते.

राज्यात गेल्या वर्षी जून महिन्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेतून पायउतार झाले.त्यानंतर खरा सत्ता संघर्ष सुरू झाला. राज्याच्या सत्तासंघर्षातील याचिकांवरील निकालात १६ आमदारांच्या अपात्रेसह पक्ष संघटनेबाबतचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हा निर्णय लवकर घेण्याची मागणी विरोधकांनी विशेषतः



शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदारांनी नार्वेकर यांची भेट घेऊन केली आहे. त्याशिवाय, न्यायालयाच्या निर्णयानुसार विधानसभा अध्यक्षांनी निर्णय देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने केली आहे. सर्व बाबी तपासून आणि न्यायालयाच्या आदेशानुसार निर्णय घेणार असल्याचे नार्वेकर यांनी सांगितले. मात्र, पुढील निर्णयासाठी ठाकरे आणि शिंदे गटाच्या पक्षाची घटना महत्त्वाची ठरणार आहे. त्याचाच भाग म्हणून निवडणूक आयोगाकडून दोन्ही गटाच्या घटना मागविण्यात येणार आहेत.

पुढारी पान क्र.5

# टाटा पॉवरकडून ज्यादा वीजबिल

## वहन शुल्कासह क्रॉस सबसिडी परत करा; ग्राहकांची मागणी

**भाईंदर : राजू काळे**

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडून वीज वितरणाची परवानगी मिळालेल्या टाटा पॉवरचे संबंधित परिसरात वीज वितरणाचे जाळेच नसल्याने या कंपनीला अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीमार्फत ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यासाठी टाटा, अदानी कंपनीला वहन शुल्कापोटी २.२१ रुपये तर क्रॉस सबसिडीकरीता ३५ पैसे असे एकूण २.५६ रुपये शुल्क प्रती युनिटमागे अदा करते. टाटाकडून वीज दर प्रती युनिटप्रमाणे निश्चित करण्यात आला असताना कंपनी, अदानी कंपनीला अदा करणारे २ रुपये ५६ पैसे हे शुल्क ग्राहकांकडून वसूल करीत आहे. ही वसुली बेकायदेशीर असल्याचा आरोप ग्राहकांनी केला असून त्यांनी टाटाने वसूल केलेले बेकायदेशीर शुल्क परत करण्याची मागणी केली आहे.

ठिकठिकाणच्या शहरी वीज वितरण क्षेत्रात खाजगी कंपन्यांनी उडी घेतली असतानाच टाटाने देखील शहरी भागातील निवासी तसेच व्यावसायिक ग्राहकांना वीज वितरणास काही वर्षांपासून सुरुवात केली आहे. टाटा ब्रँड सर्वच क्षेत्रात अग्रेसर असला तरी या ब्रॅण्डच्या टाटा पॉवर कंपनीने स्वतःचे वीज वितरणाचे जाळे निर्माण न करता इतर वीज वितरण करणाऱ्या कंपनीच्या मदतीने ग्राहकांना वीज वितरण करण्यास सुरुवात केली आहे. यात वीज वितरणाचे जाळे असलेल्या कंपनीच्याच विद्युत केबलमधून टाटा ग्राहकांना वीज वितरण करीत असल्याने यापोटी टाटा त्या कंपनीला २ रुपये २१ पैसे वहन शुल्क व ३५ पैसे क्रॉस सबसिडी शुल्क अदा करते. टाटा हे शुल्क ग्राहकांच्याच खिशातून वसूल करीत असल्याचे अलिकडेच वीज नियामक आयोगाने वीज दर निश्चित केल्यामुळे निदर्शनास आले आहे. यामुळे आयोगाने टाटाला गेल्या २०१८ पासून त्यांच्या वीज वितरण क्षेत्रात वितरण जाळे निर्माण करण्याचे निर्देश देत आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष जाणाऱ्या टाटाने अलिकडील काळात मुंबईतील काही भागांमध्येच वीज वितरण जाळे निर्माण केल्याचे समोर आले आहे. यामुळे येथील टाटा पॉवरच्या ग्राहकांना स्वस्त दरात वीज प्राप्त होत असल्याचे सांगण्यात येत आहे. तर उर्वरीत भागांतील ग्राहकांना हिच वीज सुमारे दुप्पट दराने वितरीत केली जात असल्याचे दिसून आले आहे.

### अन्यथा कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

टाटाने स्वतःचे वीज वितरणाचे जाळे निर्माण केल्यास अतिरीक्त शुल्क वगळून ग्राहकांना प्रती युनिटमागे निम्म्या दरात वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वीज नियामक आयोगाने देखील टाटाला जून पर्यंत स्वतःचे वीज वितरण जाळे निर्माण करण्याचे निर्देश दिल्याचे आयोगाच्या सुत्रांकडून सांगण्यात आले. तूर्तास टाटाने ग्राहकांकडून वसूल केले जाणारे अतिरीक्त शुल्क रद्द करून ग्राहकांना दिलासा द्यावा अन्यथा टाटा पॉवरच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्राहकांकडून दिला जात आहे.

> टाटाने वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार स्वतःचे वीज वितरण जाळे तात्काळ निर्माण करून ग्राहकांच्या माथी मारलेले शुल्क रद्द करावे. यापूर्वी वसूल केलेले शुल्क ग्राहकांच्या बिलामध्ये वळते करावे अन्यथा त्यांना परत करावे.
>
> **- प्रकाश नागणे,**
> ग्राहक (टाटा पॉवर)

CamScanner

पुढारी पान क्र. 7

# विजेचे बिल अपडेट करण्याच्या नावाखाली १ लाखाची फसवणूक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेला राहणाऱ्या ५४ वर्षीय इसमाला विजेचे बिल अपडेट झालेले नाही . विजेचे बिल अपडेट करण्याच्या नावाखाली ऑनलाईन १ लाखाची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नर्मदा नगर, कॅबीन क्रास रोड येथे राहणारे मोदकुमार पाठक (५४ ) यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर तुमची लाईट कट करणार आहे तुमचे लास्ट महीन्याचे लाईटबिल अपडेट झाले नाही म्हणुन तुम्ही पाठवलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क करा असा मेसेज आला. त्यावेळी पाठक यांनी दिलेल्या फोन नंबर वर फोन करून लाईटचे बिल भरले आहे सांगितले. त्यावेळेस त्याने तुमचे लास्ट महिन्याचे लाईटचे बिल दिसत नाही तर तुम्ही त्यासाठी १ रुपया पाठवा. त्यानंतर त्या व्यक्तीने त्याचे व्हाटसअप नंबरवरून एक लिंक पाठवुन सांगीतले जो नंबर मी सांगेन त्यावर तुम्ही १ रूपया पाठवा. यानंतर पाठक यांनी १ रूपया पाठविला. त्यांनंतर त्यांनी मला तुमचे लाईट बिल अपडेट होईल व तुम्हाला मेसेज येईल असे सांगितले. दुसऱ्या दिवशी त्यांच्या बँक खात्यातून ४ वेळेस पैसे डेबिट झाल्याचे मेसेज आले. एकूण १ लाख ८९३ रुपये डेबिट झाले. त्यावेळी मोबाईल धारक याने लाईट बिट अपडेट करायचे आहे, असे सांगून पाठक यांची ऑनलाईन फसवणूक केली. या प्रकरणी भामट्यावर नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# आयपीएलवर सट्टा लावणाऱ्यावर कारवाई

**मिरारोड :** भाईंदर येथील रामदेव पार्क परिसरात एक इसम आयपीएलच्या मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स या आयपीएल मॅचवर सट्टा घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. सत्री बापी दास ( २१) असे आरोपीचे नाव असून तो साथीदार सचिन पांडे व इतर तीन जणांनी वेगवेगळ्या वेबसाईडव्दारे ऑनलाईन जुगार स्वतः चे फायद्यासाठी सामान्य लोकांची अप्रामाणिकपणे लबाडीच्या इराद्याने फसवणूक करून ऑनलाईन क्रिकेट सट्टा खेळताना व खेळविताना आढळले. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सत्री बापी दास याला अटक करण्यात आली.

सट्ट्यासाठी सचिन पांडे यांनी आयडी ओपन करून २४ जणांना सट्टा लावण्यासाठी अकाउंट दिले होते.

लोकमत पू. पान क्र. 3

# मीरा-भाईंदर महापालिका मुख्यालयात उधळल्या नोटा

## शौचालयातील खोली रिकामी केल्याने केला निषेध

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक शौचालयातल्या खोल्या प्रशासनाने रिकाम्या करायला लावल्यानंतर पूर्वीच्या ठेकेदाराकडील कर्मचाऱ्यांनी मुख्यालयात येऊन नोटा उडवून निषेध आंदोलन केले. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन २२ ते २७ जणांवर भाईंदर पोलिस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.



महापालिकेच्या सार्वजनिक शौचालयाच्या सफाई व देखभाल करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक शौचालयाच्या वर खोली बांधलेली आहे. २०१९ मध्ये नेमलेल्या शाइन सर्व्हिस या ठेकेदाराचे कामगार कुटुंबासह शौचालयावरील खोलीत राहत होते. २०२३ मध्ये हे कंत्राट स्वामी समर्थ सिक्युरिटी हॉस्पिटॅलिटी या ठेकेदारास दिले आहे. नवीन ठेकेदाराने नवीन कामगार नेमल्याने त्यांच्यासाठी संबंधित खोली रिकामी करण्याचे लेखी कळवले. मात्र, तरीही खोली रिकामी न केल्याने प्रशासनाने महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या सोबत जाऊन खोल्या रिकाम्या केल्या. यामुळे संतप्त झालेल्या लोकांनी शुक्रवारी महापालिका मुख्यालयात येऊन निषेधाच्या घोषणा दिल्या. त्यातील एका व्यक्तीने गळ्यात नोटांचे बंडल अडकवून पालिकेवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. तसेच प्रवेशद्वारावर नोटा हवेत उडवल्या. महापालिकेच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिसांनी हेमंत कानाबार व गीता कानाबारसह अन्य २० ते २५ महिला व पुरुषांवर सरकारी कामात अडथळा आणण्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

सार्वजनिक शौचालये ही महापालिकेची मालमत्ता आहे. राहायला दिलेल्या खोलीत वीज, पाणी त्यांना मोफत होते. काहींनी खोल्या भाड्याने दिल्या. त्यामुळे प्रशासनाने नवीन ठेकेदारास खोलीचे चार हजार भाडे, वीज व पाणी बिल भरण्याची अट टाकली आहे.

\- रवी पवार,
उपायुक्त, महापालिका

CamScanner

लोकमत पान क्र. 5

# बायको घरी न आल्याने भगताची ठेचून हत्या

## पतीला अटक; पालघर जिल्ह्यातील घटना

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ/नालासोपारा : मांडवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत २५ मे रोजी करण्यात आलेल्या भिवा या वृद्ध भगताच्या हत्येचा छडा २४ तासांत लावण्यात मांडवी पोलिसांना यश आले. एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. माहेरी गेलेली बायको घरी यावी, यासाठी तिच्या पतीने भगताला जागरणचा विधी करण्यासाठी दोन हजार रूपये दिले होते. मात्र, भगताने विधी न केल्याने त्याने त्याची हत्या केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केवळ दोन हजारांसाठी ही हत्या केल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी तीन पथके तयार करून शोध घेतला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शिरसाड येथे आरोपी विनोद ऊर्फ कांद्या महादू बसवंत (३५) यास सापळा रचून पकडण्यात आले. तो उसगाव येथेच राहणारा आहे. विनोद याने आपली बायको घरी यावी यासाठी जागरण करण्यासाठी भिवा या भगतास दोन हजार रूपये दिले होते. मात्र, पत्नी पुन्हा घरी येण्याचा विधी न केल्याचा मनात राग धरलेल्या विनोदने भिवा यास बोलावून दारू पाजली. त्यानंतर बाचाबाची करून भिवा यास निर्जन ठिकाणी नेऊन त्याचा खून केला होता. विनोद हा सराईत गुन्हेगार असून, यापूर्वी खुनाच्या प्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती. मात्र, कोरोनामुळे त्याला सोडण्यात आले होते.

### आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचा

आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याने त्याचे समाजात खुलेपणाने वावरणे धोक्याचे आहे. त्याला कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मांडवीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी सांगितले.

लोकमत पान क्र. 10

# बंदुकीच्या धाकाने सराफावर हल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडमध्ये बंदुकीचा धाक दाखवून सराफाला लुटण्याचा प्रयत्न दोघा लुटारूंनी केला. मात्र त्याने धाडसाने प्रतिकार केल्याने लुटारू मोबाईल घेऊन पळून गेले. विजय पार्क भागात मोहित कोठारी यांचे कोठारी ज्वेलर्स आहे. शनिवारी सायंकाळी दुकानात २० ते २५ वयोगटातील दोन तरुण दागिना खरेदी करण्यासाठी आले. दोघे दुकानात आले तेव्हा त्यांच्या तोंडावर रूमाल होता. त्यांनी जुनी अंगठी देऊन नवीन अंगठी खरेदी करायची असल्याचे सांगितले.

कोठारी यांना संशय आल्याने त्यांनी दोघांना दुकानाबाहेर जाण्यास सांगितले. त्यावेळी एकाने बॅगेतून रिव्हॉल्वर काढून कोठारींवर रोखले. आधीच सावध झालेल्या ज्वेलरने खाली वाकून रॉड काढला आणि दोघांवर हल्ला चढवला. त्यांचा आक्रमक प्रतिकार पाहून लुटारू पळून गेले. जाताना त्यांनी कोठारी यांचा मोबाईल पळवला. या झटापटीत कोठारी किरकोळ जखमी झाले.

दरोड्याचा प्रयत्न दुकानातील सीसीटीव्हीत कैद झाला आहे. लुटारू दुचाकीवरून सिल्वर पार्कच्या दिशेने पळून गेले.

CamScanner